<u>वाहतूक नियंत्रण अधिसूचना</u>

**क्र./नापोआ/सांगली सिग्नल ते आरके/अधिसुचना/२६०७/१८.नाशिक,दि १८/११/१८.**

ज्याअर्थी, **'' त्रंबक नाका ते अशोक स्तंभ''** पावेतोचे **दोन्ही बाजुचे** मार्गाचे रस्त्याचे पायलट स्मार्ट रोडचे कामा अंतर्गत प्रथम **'अशोक स्तंभ ते त्रंबक नाका'** पावेतोचे मार्गाचे कामास सुरवात करण्यात आलेली असुन सदर मार्गाचे अर्ध्या भागातुन दुहेरी वाहतुक सुरू करण्यात आली आहे त्यामुळे सदर ठिकाणी मोठया प्रमाणात वाहतुक कोंडीची समस्या निर्माण होवुन त्याचा वाहन धारकांना त्रास होतो त्यासाठी खबरदारीची उपाययोजना म्हणून सदर पायलट स्मार्ट रोडचे काम होई पावेतो **<u>त्रंबकनाका सिग्नल बाजुकडून अशोकस्तंभ बाजुकडे एकेरी वाहतूकीत बदल करणे</u>** आवश्यक असले बाबत माझी खात्री झाली आहे.

त्या अर्थी, मी लक्ष्मीकांत पाटील पोलीस उपआयुक्त, वाहतूक,नाशिक शहर महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र.एम.व्ही.ए.--११६/सीआर/३७/टी आर दि.२७/०९/१९९६ चे अधिसूचनेनूसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून वाहतूकीची कोंडी होवू नये म्हणून व आम जनतेच्या सोईसाठी वाहतुक नियंत्रण अधिसूचना प्रसिध्द करीत आहे.

**त्रंबकनाका सिग्नल बाजुकडून अशोकस्तंभ बाजुकडे जाणारे मार्गावर सर्व प्रकारचे वाहनांना एकेरी वाहतुकीसाठी सुरू करण्यात येत आहे.**

<u>पर्यायी मार्ग</u>

स्मार्ट सिटी योजने अंतर्गत स्मार्ट रोड पायलट प्रोजेक्ट म्हणुन अशोक स्तंभ ते त्रंबकनाका या मार्गाचे नुतनीकरण होणार असल्याने पंचवटीकडुन येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना सिबीएसकडे जावयाचे असल्यास त्यांनी आर.के. — सांगली बॅक सिग्नल -- शालीमार --शिवाजीरोड — सिबीएस असे मार्गस्थ होतील. व त्रंबकनाका सातपुरकडे जावयाचे असल्यास शालीमार—खडकाळी सिंग्नल--जिल्हा परिषद मार्ग त्रंबकनाका मार्गस्थ होतील.

गंगापुररोडकडुन/रामवाडी पुलाकडून येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना मेहेर सिग्नल /सिबीएस/त्रंबकनाकाकडे जावयाचे असल्यास त्यांनी

१) अशोकस्तंभ—रविवार कारंजा--सांगली बॅक सिग्नल—मेहेर सिग्नल.
२) अशोकस्तंभ--रविवार कारंजा—सांगलीबॅक सिग्नल—शालीमार —शिवाजीरोड--सिबीएस
३) अशोकस्तंभ—रविवार कारंजा—सांगलीबॅक सिग्नल--शालीमार--खडकाळी सिग्नल—जिल्हापरिषद—त्रंबकनाका—सातपूर असे मार्गस्थ व्हायचे आहे.

**किंवा**

गंगापुरनाका —कॅनडा कॉर्नर—टिळकवाडी मार्गे सिबीएस असे मार्गस्थ व्हायचे आहे.

मुंबई नाकाकडुन पंचवटी कडे जाणाऱ्या वाहनांनी मुंबईनाका —वडाळानाका—द्वारका—आडगाव नाका—काटया मारूती—निमाणी या मार्गाचा अवलंब करावा.

सिडको व सातपुरकडुन पंचवटीकडे जाणाऱ्या वाहनांनी मायको सर्कल--जुना सिटीबी सिग्नल — एचडीएफसी सर्कल—कॅनडा कॉर्नर—जुना गंगापुर नाका—रामवाडी किंवा ड्रिम कॅसल मार्गे पंचवटी कडे मार्गस्थ व्हावे.

**(सदर रोडचे काम चालु असल्यामुळे त्रंबकनाका ते अशोकस्तंभ व त्रंबकनाका ते किटकॅट कॉर्नर परीसरात नो हॉल्टींग, नो पार्किंग झोन कार्यरत करण्यात आलेला आहे.)**

सदरील अधिसुचना दिनांक २०/११/२०१८ रोजी पासुन ते सदर स्मार्ट पायलट रोडचे काम होईपावेतो अमलात येईल